दिनांक / /

# ॲलोटमेंट लेटर

प्रति

-------------------

-------------------

-------------------

विषय : **मौजे अंबड खुर्द ता. जि. नाशिक येथील गट नंबर २२२/अ / १ प्लॉट क्रमांक २५ यांसी क्षेत्रफळ ६३०.०० चौ. मी. येथील अनय रेसिडेन्सी अपार्टमेंट या प्रकल्पातील फ्लॅट किंवा दुकान/ वेश्म क्रमांक यांचे ॲलोटमेंट बाबत.**

महोदय

१) आम्ही **मौजे अंबड खुर्द ता. जि. नाशिक येथील गट नंबर २२२/अ / १ प्लॉट क्रमांक २५ यांसी क्षेत्रफळ ६३०.०० चौ. मी.** येथील **अनय रेसिडेन्सी अपार्टमेंट** या नांवाने प्रकल्प संबंधीत असून सदरहू प्रकल्प ज्या ठिकाणी तुम्ही प्रत्यक्ष येवून प्रकल्पाची पाहणी केलेली असून त्यानुसार तुम्ही सदरहू प्रकल्पामधील खालील नमूद मिळकतीचे ॲलोटमेंट संदर्भाने विनंती केलेली आहे त्यानुसार तुम्हास सर्व अटी व शर्ती तसेच प्रकल्पाची संपूर्ण माहितती दिलेली असून त्यासर्व बाबी तुम्ही मान्य व कबूल केलेल्या असल्याने तुमचे लाभात सदरचे ॲलोटमेंट देण्यात आलेले आहे.

२) तुम्ही दिलेल्या माहितीनुसार ॲलोटमेंट करण्यात आलेल्या व्यक्तीची नांवे व तुम्हास ॲलोट केलेल्या सदनिकेचा तपशिल .

(१)नांव ____________________

(२)पत्ता ____________________

(३)पॅन ____________________

(४)ॲलोट सदनिकेचा क्रमांक ____________

(५)कार्पेट क्षेत्र ____________ चौ. मी.

(६)पार्कींग ____________

(७)मजला ____________

(८)विंग ____________

(९)प्रकल्पाचे नांव **अनय रेसिडेन्सी अपार्टमेंट**

(१०) शिवार - अंबड खुर्द

(११) गट नंबर २२२/अ/१ यातील प्लॉट क्रमांक २५ यांसी क्षेत्रफळ ६३०.०० चौ. मी.

(१२) किंमत रूपये ____________

३) वर नमूद **फ्लॅट किंवा दुकान/ वेश्म** तुम्हास किंमत **रूपये** ____________________ ठरवून ॲलोट करण्यात आलेली असून ही किंमत कायम करण्यात आलेली आहे.

सदर किंमतीपैकी रक्कम रूपये ____________ मात्र तुम्ही आम्हास ____________ या बँकेवरील चेक क्रमांक ____________ दिनांक ______ रोजी विसार/ आगाऊ रक्कम म्हणून अदा केलेली आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. ( एकूण किंमतीच्या १०% )

४) सदर किंमतीचे रक्कमेचे खालील बाबींच्या रक्कमा समाविष्ट नुसार त्या तुम्ही किंमती व्यतिरिक्त वेगळ्या द्यावयाच्या आहेत ही बाब तुम्ही मान्य व कबूल केलेली आहे.

अ) मिळकती संदर्भाने दस्त नोंदणीकामी होणारा स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी व इतर खर्च

ब) नळ कनेक्शनचा खर्च

क) विद्युत कनेक्शनचा खर्च

ड) सोसायटी / अपार्टमेंट किंवा संघ नोंदणी खर्च, प्रवेश फी व इतर खर्च

इ) बांधकामा संदर्भाने व चालू कामा संदर्भाने लागू असलेले सर्व कर जसे की, जी. एस. टी. व इतर कर, उपकर तसेच भविष्यात बांधकाम चालू असे पावेतो व त्यानंतरही जे कोणतेही कर लागू होतील ते कर.

५) सदरचे जमीन मिळकती संदर्भाने लिहून देणार यांचे मालकी हक्क दर्शविणारी व मिळकतीचे टायटल संदर्भाने असलेली संपूर्ण कागदपत्रे जसे, ७/१२ उतारे, नोंदी , खरेदीखते व इतर दस्तऐवजे तसेच लिहून देणार यांनी नियुक्त केलेल्या वास्तुशास्त्रज्ञ आणि स्थापत्य अभियंता यांनी तयार केलेले नकाशे, इमारत नकाशे , आराखडे, व इतर नकाशे तसेच स्थावर संपदा ( विनियमन व विकास ) अधिनियम २०१६ या मध्ये नमूद कागदपत्रे यांच्या प्रती लिहून घेणार यांना निरीक्षणासाठी व अवलोकनाकामी यापूर्वीच दिलेल्या आहेत. त्यानुसार लिहून घेणार यांनी सदरील कागदपत्रांची तपासणी लिहून घेणार यांनी केलेली असून लिहून घेणार यांची खात्री पटलेनंतरच लिहून घेणार यांनी मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसेच इमारत नकाशा हा नाशिक महानगर पालीका नाशिक यांनी **पत्र क्रमांक एल. एन. डी. / बी. पी. / अंबड/ डी सी आर /०१०९/२०१७ दिनांक ०६/०१/२०१८ रोजी** मंजूर केलेला आहे. सदर इमारत नकाशा मध्ये फेरबदल करणे, फेरबदल केलेले नकाशे महानगर पालीका नाशिक यांचे कडून मंजूर करणे, वाढीव बांधकामा कामी तसेच फेरबदल केले प्रमाणे इमारतीचे बांधकाम करणे याकामी तुम्ही आम्हास कायमची संमती दिलेली आहे. म्हणून तुमचे कडून वेगळी संमती घेण्याची गरज राहणार नाही.

६) सदरहू सदनिकेची व पार्कींग क्षेत्राची एकूण किंमत **रक्कम रूपये** --------------- कायम करण्यात आलेली असून सदरहू रक्कमेपैकी **रक्कम रूपये** --------------( **किंमतीच्या १०% रक्कम** ) तुम्ही आम्हास चेक क्रमांक ------------------ दिनांक ------------ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र अन्वये अदा केलेली आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. त्यानुसार शिल्लक व उर्वरीत किंमत **रक्कम रूपये** ------------------- तुम्ही आम्हास खालील नमूद टप्प्या-टप्प्याने अदा करण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| रक्कम रूपये | तपशिल |
|---|---|
| २०% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदरचा करारनामा नोंदविल्याचे दिनांकापासून १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| १५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे प्लिंथचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| १०% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे पहिल्या स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे दुसऱ्या स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे तिसरा स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे चौथा स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे विट बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना उक्त **फ्लॅट किंवा दुकान/ वेश्म** ज्या मजल्यावरील अंतर्गत गिलावा ( प्लास्टर ), स्वच्छता विषयक जुळण्या , जिने यांचे काम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना इमारतीचे नळकाम, बाहेरील गिलावा ( प्लास्टर ) गच्चीचे काम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना उदवाहन, पाण्याचे पंप, विद्यूत जोडणी, अंगभूत क्षेत्राची फरसबंदी व इतर कामे पूर्ण झालेनंतर १० दिवसांचे आत अदा करावयाचे आहेत. |
| १०% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना उक्त इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होवून कब्जा लिहून घेणार यांनी स्विकारण्या संदर्भाने लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना लेखी कळविल्याचे दिनांकापासून १० दिवसाचे आत करावयाचे आहेत. |

---------------

९०%

=============

७) सदर रक्कमा वर नमूद केल्या नुसार वेळचेवेळी तुम्ही आम्हास अदा करावयाची आहे ही महत्वाची अट व शर्त आहे. जर सदर रक्कमा तुम्ही आम्हास अदा करण्यास विलंब झाल्यास, सदर ॲलोटमेंट रद्द करण्याचे आमचे हक्कास बाधा न येता सदर देय रक्कमेस विलंबाचे संपूर्ण कालावधी करीता ----% **द. सा. द. शे.** व्याज आकारण्यात येईल व त्यानुसार तुम्ही व्याजासह रक्कमा आम्हास अदा करावयाच्या आहेत.

८) वर नमूद केल्या नुसार तुम्ही आम्हास रक्कमा देण्यास विलंब केल्यास विलंबाचे संदर्भाने व्याजासह रक्कम देण्याचे आम्ही तुम्हास कळविल्याचे दिनांकापासून **१५ दिवसाचे** आत तुम्ही सदर देय रक्कम व व्याजाची रक्कम अदा न केल्यास सदर ॲलोटमेंट एकतर्फी व आपोआप रद्द होईल व त्यानंतर सदर मिळत कोणत्याही त्रयस्थ खरेदीदारांस ॲलोट करण्यात येईल, त्यावर तुम्हास हरकत घेण्याचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच अशावेळी तुमची ॲलोटमेंट रद्द झाल्यास त्यावेळे पावेतो तुमचे कडून आम्हास प्राप्त झालेल्या संपूर्ण रक्कमे मधून १०% रक्कम कपात करून उर्वरीत रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल तसेच करापोटी तुम्ही कोणतीही रक्कम दिलेली असल्यास व ती आम्ही शासनजमा केलेली असल्यास अगर करावी लागत असल्यास ती तुम्हास परत करण्यात येणार नाही. अगर तुमचे वतीने आम्ही कोणताही कर भरलेला असल्यास ती रक्कम देखील कपात करून उर्वरीत रक्कम तुम्हास बिनव्याजी परत करण्यात येईल.

९) सदर ॲलोटमेंट लेटरचे दिनांकापासून **३० दिवसाचे** आत तुम्ही सदर ॲलोटमेंट मिळकती संदर्भाने करारनामा हा दस्त नोंदविण्याची संपूर्ण कार्यवाही तुमचे पदर खर्चाने पूर्ण करून दस्त नोंदणी करून देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे.

१०) सदर तुम्हास ॲलोट केलेल्या मिळकतीचे संदर्भाने तुम्ही आहास संपूर्ण किंमतीची रक्कम व इतर देय रक्कमा अदा केल्या शिवाय सदर मिळकत तुम्ही त्रयस्था इसमास विक्री , हस्तांतर , तबदिल करण्याचे, गहाण देण्याचे तुम्हास कोणतेही हक्क व अधिकार राहणार नाही.

११) सदरहू तुम्हास ॲलोट करण्यात आलेल्या मिळकतीचा कब्जा तुम्हास **दिनांक** -------- पावेतो देण्यात येईल मात्र सदर कब्जा देण्यास युद्ध, नागरी विक्षोभ, किंवा दैवी कृती अगर शासनाची, न्यायालयाची आणि किंवा इतर सार्वजनिक अथवा सक्षम प्राधिकरणाची कोणतीही नोटीस, आदेश, नियम , अधिसुचना कारणांमुळे अगर शासन/ प्राधिकरणा कडून कोणतीही परवानगी मिळण्यास विलंब या कारणामुळे अगर तुमचे कसुरीमुळे विलंब होवू शकतो ही बाब तुम्ही मान्य व कबूल केलेली आहे.

१२) सदर ॲलोटमेंट पोटी तुम्ही आम्हास दिलेला आगाऊ रक्कमेचा चेक अनादरीत ( परत आल्यास ) झाल्यास सदरचे ॲलोटमेंट आपोआप रद्द होईल त्याकामी तुम्हास कळविण्याची आवश्यकता राहणार नाही.

१३) सदर वर नमूद बाबी तुम्ही मान्य व कबूल केलेल्या असून त्याचे मान्यते करीता सदर ॲलोटमेंट लेटर वर सही करून दिलेली आहे.

----------------------          ----------------------